**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ०२ ऑगस्ट २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विविध केंद्रीय संस्थांनी राज्यांमध्ये समन्वयानं काम करणं गरजेचं असून, घटनात्मक प्रमुख या नात्यानं राज्यपालांनी ही प्रक्रिया सुलभ करायला हवी, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन.**
2. **आपत्कालीन परिस्थितीत तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याचे राज्याचे आरोग्य मंत्री डॉ.तानाजी सावंत यांचे साथरोग नियंत्रणाबाबत आढावा बैठकीत निर्देश.**
3. **नागपुरातील नियोजन भावनाचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्‌घाटन, नागपूर जिल्ह्यासाठी 1200 कोटीपेक्षा अधिकचा निधी हा विकास आराखड्यासाठी जिल्हा नियोजन विकास बैठकीत मंजूर.**
4. **उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर जिल्ह्यात तीन प्राथमिक आरोग्य केंद्राचं लोकार्पण, आशा सेविकांना मोबाईल तर युवकांना नियुक्तीपत्र प्रदान.**

****

राज्यपालांची परिषद

लोकशाहीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी विविध केंद्रीय संस्थांनी राज्यांमध्ये समन्वयानं काम करणं गरजेचं असून, घटनात्मक प्रमुख या नात्यानं राज्यपालांनी ही प्रक्रिया सुलभ करायला हवी, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीमध्ये राष्ट्रपती भवन इथं आयोजित राज्यपालांच्या दोन दिवसीय परिषदेचं उदघाटन राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते आज झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. या परिषदेत केंद्र-राज्य संबंधांसह सर्वसामान्य नागरिकांच्या कल्याणाशी निगडित विविध मुद्‌द्यांवर चर्चा होणार आहे. दरम्यान राज्यपालांना केंद्र आणि राज्य यांच्यातील प्रभावी सेतूची भूमिका बजावण्याचे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या भाषणात केलं. लोक आणि सामाजिक संस्थांशी संवाद साधून जे लोक वंचित आहेत त्यांना सहकार्य करण्यात राज्यपालांनी पुढाकार घ्यावा, असं देखील ते म्हणाले.या दोन दिवसीय परिषदेत तीन फौजदारी कायद्‌यांची अंमलबजावणी, उच्च शिक्षणात सुधारणा आणि विद्‌यापीठांची मान्यता, आदिवासी क्षेत्र, आकांक्षी जिल्हे आणि ब्लॉक्स, सीमावर्ती भाग यासारख्या केंद्रित क्षेत्रांचा विकास याविषयावर विचारविनिमय होणार आहे. त्याचप्रमाणे 'माय भारत', 'एक भारत श्रेष्ठ भारत'

आणि 'एक पेड माँ के नाम' तसंच नैसर्गिक शेती या मोहिमांमध्ये राज्यपालांची भूमिका; राज्यातल्या विविध केंद्रीय संस्थांमध्ये उत्तम समन्वय साधण्यात राज्यपालांचं योगदान या मुद्द्यांचाही समावेश आहे. या परिषदेला उपराष्ट्रपती यांच्यासह केंद्रीय मंत्री, नीती आयोगाचे उपाध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मंत्रालयातले वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित आहेत.

एल मुरुगन/शिवराजसिंग चौहान-राज्यसभा

खोट्या बातम्या आणि दिशाभूल करणारी माहिती ही समाजातली अपप्रवृत्ती असून तिला वेळीच आळा घालणं अत्यावश्यक आहे, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ एल मुरुगन यांनी आज राज्यसभेत सांगितलं. या संदर्भातल्या पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या पत्र सूचना कार्यालयाअंतर्गत २०१९ मध्ये सुरू केलेल्या तथ्य तपासणी विभागानं आतापर्यंत ९ हजार ९२२ संदेश बनावट बातम्या म्हणून उघड केले आहेत, असं त्यांनी सांगितलं. केंद्र सरकारशी संबंधित कोणत्याही बातम्यांची शहानिशा करून त्या खऱ्या आहेत की खोट्या हे केवळ सरकारच ठरवू शकतं, असं केंद्रीय माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी या चर्चेदरम्यान सांगितलं, तर प्रसारमाध्यमं हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असल्याचं राज्यसभेचे सभापती उपराष्ट्रपती जगदीप धनखड म्हणाले. कृषीक्षेत्राचा विकास आणि शेतकऱ्यांच्या कल्याणाकरता केंद्रसरकार वचनबद्ध आहे, असं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी आज राज्यसभेत सांगितलं. केंद्र सरकारनं यंदाच्या अर्थसंकल्पात कृषिक्षेत्रासाठी एक लाख ३२ हजार कोटी रुपयांहून अधिक तरतूद केली असून २०१३-१४ च्या तुलनेत ती २७ हजार कोटी रुपयांनी अधिक आहे, असं ते म्हणाले. केंद्र सरकार सिंचनावर लक्ष केंद्रित करत असल्यानं वर्ष २०२३-२४ मध्ये देशात ३२९ दशलक्ष टन इतक्या विक्रमी अन्नधान्याचं उत्पादन झालं, अशी माहिती त्यांनी दिली.

डॉ.तानाजी सावंत

यावर्षी पावसाचे वितरण असमान दिसून येत आहे. काही भागात कमी कालावधीत मोठा पाऊस होत आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र आणि पूर्व विदर्भातील भागात पूरपरिस्थिती निर्माण झाली. पूर परिस्थितीत साथ रोग नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने सतर्क असावे. त्यासाठी शहर, गावांमध्ये स्वच्छतेसह डास निर्मूलन मोहीम राबवावी. पुरासारख्या आपत्कालीन परिस्थितीत आरोग्य विभागाने तातडीने आरोग्य सेवा उपलब्ध करून द्यावी, असे निर्देश राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी आज दिले. दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे पुणे येथून मंत्री डॉ.

सावंत यांनी राज्यातील साथरोग नियंत्रणाबाबत आढावा घेतला. यावेळी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे आरोग्य विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलींद म्हैसकर, संचालक डॉ. नितीन अंबाडेकर,सहसंचालक डॉ. राधाकिसन पवार आणि सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी उपस्थित होते. ग्रामपंचायतस्तरावर डास निर्मूलन, अशुद्ध पाणी, साथरोगाबाबत घ्यावयाची काळजी याबाबत ठळक अक्षरात जनजागृतीपर लावण्यात यावेत. यामुळे गावपातळीवर नागरिक जागरूक होवून प्रतिबंधात्मक उपाययोजना करतील. दवाखान्यांमध्ये मनुष्यबळ कार्यरत असेल याविषयी सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी जिल्ह्यातील डॉक्टर, संबंधित यंत्रणेशी जिल्हा शल्य चिकित्सक आणि जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दररोज किमान एक तास दूरदृश संवाद प्रणालीद्वारे संवाद साधून साथरोगाबाबतची परिस्थिती जाणून घ्यावी. आरोग्यसेवेसाठी बाळासाहेब ठाकरे आपला दवाखानाची मदत घेण्यात यावी, असेही मंत्री डॉ. सावंत यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

नागपूर जिल्ह्यासाठी 1200 कोटीपेक्षा जास्त निधी हा विकास आराखड्यासाठी जिल्हा नियोजन विकास बैठकीत मंजूर करण्यात आला असून 5 हजार कोटी पेक्षा अधिक रकमेची कामे ही राज्य शासनाच्या वतीने नागपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यात येतील अशी माहिती उपमुख्यमंत्री आणि नागपूरचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नागपुरातील सदर परिसरात असणाऱ्या नियोजन भावनाच्या उद्घाटनानंतर या भावनात पहिल्यांदाच झालेल्या जिल्हा नियोजन समिती बैठकीच्या नंतर आज ते पत्रकारांशी बोलत होते. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संरक्षित वनक्षेत्राच्या लगत आहेत त्यांना वन्य प्राण्यांच्या संरक्षणासाठी 'सोलर फेसिंग' - सौरकुंपण घेण्यासाठी जिल्हा नियोजन निधीतून मदत करण्यात येईल. शेतरस्ते पाणंद रस्ते विकास कामासाठी निधी राखीव ठेवला असल्याचे त्यांनी सांगितलं. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांना मोफत वीज देण्या विषयी माहिती दिली-

नागपूर शहरात सर्वत्र विकास कार्य चालू असल्याने खोदकाम आणि वाहतूक वळवण्यात येत आहे त्यामुळे नागरिकांना त्रास होत आहे. परंतु ही कामे वेगाने पूर्ण करू असे देखील फडणवीस यांनी एका उत्तराच्या दाखल स्पष्ट केले.

वार्षिक उर्स

हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेल्या हजरत बाबा ताजुद्दीन यांचा 102 वा वार्षिक उर्स नागपुरात साजरा होत असून त्या निमित्त ताजबाग येथून आज शाही संदल काढण्यात आला. या संदलमध्ये मोठ्या प्रमाणात नागरिक सहभागी झाले

होते. येत्या 10 ऑगस्टपर्यंत नागपूर शहरात वार्षिक उर्स ताजबाग इथं साजरा करण्यात येत आहे. शहराच्या मोठा ताजबाग, सक्करदरा चौक, चिटणीस पार्क , अग्रसेन चौक, गांजाखेत चौक, महाल चौक, शितलामाता चौक मार्गे या संदलचं मार्गक्रमण होऊन मोठा ताजबाग इथंच संदल समाप्त होतो, अशी अनेक वर्षांची परंपरा आहे. शाही संदल निमित्त अनेक ठिकाणी लंगर आयोजिण्यात आले आहेत.

दूषित पाणी

गोंदिया जिल्ह्याच्या अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील नवेगाव/बांध इथं पाणीपुरवठा योजनेद्वारे झालेल्या दूषित पाणीपुरवठ्यामुळं गावातील लोकांना मोठ्या प्रमाणात अतिसाराची लागण झाली आहे. त्यामुळे मागील दोन ते तीन दिवसापासून ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची गर्दी वाढत आहे. आज 12 रुग्ण रुग्णालयात भरती झाले आहेत. संभाव्य धोका लक्षात घेता एका रुग्णाला जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया इथं पाठवण्यात आल्याचं आमच्या प्रतिनिधीने कळवलं आहे.

स्तनपान सप्ताह

1 ते 7 ऑगस्ट 2024 पर्यत भंडारा इथल्या जिल्हा सामान्य रुग्णालयातील बालरोग विभागात जागतिक स्तनपान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. या वर्षीच्या जागतिक स्तनपान सप्ताहाचे घोषवाक्य 'आई आणि बाळामधील अंतर कमी करूया, स्तनपानाला समर्थन देऊया' हे आहे. कार्यक्रमाचे उद्घाटन भंडारा जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सोयाम यांच्या हस्ते करण्यात आलं. बाळाला सहा महिने फक्त आईचेच दूध द्यावे, सुरुवातीचे १००० दिवस बाळ आईच्या पोटात असेपासून ते दोन वर्षपर्यंत स्तनपान किती महत्त्वाचे आहे, या विषयी स्तनदा माता आणि गरोदर स्त्रियांना तसेच त्यांच्या कुटुंबीयांना त्यांच्या बोली भाषेत त्यांना समजेल अशा शब्दात सांगण्यावर भर द्यावा, असं आवाहन बालरोग तज्ञांनी स्तनपानाचे महत्त्व सांगतांना केलं.

आशासेविका

राज्य शासनाने महिला केंद्रीत धोरण आखले असून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. युवकांच्या हाताला काम देण्यासाठी ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’ ही महत्त्वाकांक्षी योजना आणली आहे. सर्व समाज घटकांच्या विकासासाठी राज्यशासन कार्यरत असून निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करत जनहिताचे निर्णय गतीने घेण्यात येणार असल्याचे प्रतिपादन, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज नागपुरात केले. नागपूरच्या कविवर्य सुरेश भट सभागृहात जिल्हा

परिषदेच्या आरोग्य विभागाकडून आयोजित कार्यक्रमामध्ये उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आभासी पद्धतीने जिल्ह्यातील तीन नवनिर्मित आरोग्य केंद्रांच्या इमारती आणि निवासस्थानांचे लोकार्पण झालं. तसेच 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने'तील लाभार्थ्यांना नियुक्तीपत्रे आणि आशा सेविकांना त्यांच्या हस्ते अँड्रॉईड मोबाईल वितरण करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.या महिन्यापासूनच आशा सेविकांना वाढीव मानधन मिळणार असल्याचे श्री.फडणवीस म्हणाले. यासोबतच आशा सेविकांना 10 लाखांपर्यंतचे विमा कवच देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले. तत्पूर्वी, उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आभासी पद्धतीने काटोल तालुक्यातील झिल्पा आणि भोरगड तसेच पारशिवनी तालुक्यातील घाटपेंढरी येथील नवनिर्मित आरोग्य केंद्रांचे लोकार्पण करण्यात आले. नागपूर जिल्हा परिषदेद्वारे मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी निवड करण्यात आलेल्या उमेदवारांपैकी पाच उमेदवारांना प्रातिनिधिकरित्या नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. प्रातिनिधिक स्वरुपात जिल्ह्यातील 130 आशा सेविकांना अँड्रॉईड मोबाईल वितरण करण्यात आले.

पॅरिस ऑलिम्पिक

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताचा आजचा दिवस सकारात्मक पद्धतीनं सुरू झाला. तिरंदाजीत अंकिता भकत आणि धीरज बोम्मदेवरा यांनी मिश्र प्रकारात इंडोनेशियाच्या जोडीचा ५-१ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरीत जागा मिळवली. यंदा दोन कास्यपदकांवर नाव कोरणारी नेमबाज मनू भाकर २५ मीटर पिस्टल प्रकारात पुढच्या अंतिम फेरीत दाखल झाली. याशिवाय आज नौकानयनात विष्णू सर्वनन आणि नेत्रा कुमारन, तसंच गोल्फमध्ये शुभंकर शर्मा आणि गगनजीत भुल्लर मैदानात उतरणार आहेत. हॉकी स्पर्धेत आज भारतासमोर ऑस्ट्रेलियाचं आव्हान असून सामना सुरू आहे. तर बॅडमिंटनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत लक्ष्य सेन लढत देईल. याशिवाय महिलांची ५ हजार मीटर आणि पुरुषांच्या गोळाफेक स्पर्धाही आज होणार आहेत.

******